# समाजवादी महिला सभा दहावे द्विवार्षिक अधिवेशन

समाजवादी महिला सभेचे दहावे द्विवार्षिक अधिवेशन धुळयाला २ व ३ जानेवारी १९८२ ला पार पडले. २ जानेवारीला सकाळी सनईच्या सुरांनी सर्वांना जागे केले. गरम गरम चहा तयार होताच: आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था होती. आम्ही चहा घ्यायला गेलो तर बऱ्यांच जणींच्या आंघोळी होऊन गेल्या होत्या. ९ वाजता उपम्याची डिश सर्वांपुढे आली. त्यानंतर दुपारच्या कार्यक्रमासाठी सर्व कार्यकर्त्या स्त्रियांची धावपळ सुरू झाली. सभेसाठी मोठा, सुबक मांडव घातलेला होता. त्याच्या प्रवेशद्वाराला नागपूरच्या नुकत्याच दिवंगत झालेल्या समाजसेविका कमलाबाई होस्पेट यांचे नाव दिले होते. सावित्रीबाई फुले यांचा १५१ वा जन्मदिन ३ जानेवारीला होता, त्यांना आदरांजली म्हणून त्या परिसराला 'सावित्रीबाई फुले नगर' असे नाव दिले होते.

विश्रामधामाचा मोठा हॉल होता. तिथे धुळे येथील स्त्रियांनी बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू मांडण्याचे काम विमल गरूड व मी करू लागलो. पुण्याहूनही पिशव्या, सतरंज्या व पांढ्या साडया विक्रीसाठी आणल्या होत्या. त्या साडयांची किंमत इतकी अल्प होती की धुळयाच्या काम करणाऱ्या बऱ्याच भगिनींनी त्या खरेदी केल्या व दुपारच्या खुल्या अधिवेशनाला सर्वजणी त्या नेसल्या होत्या. नऊवार नेसणाऱ्या एका भगिनीने तर रात्री दोन साडया जोडून त्याची नऊवार करून ती नेसली होती.

प्रदर्शनाच्या हॉलच्या बाजूला लांबच लांब पेटया पडल्या होत्या. थोडयाच वेळात खासदार प्रमिला दंडवते तिथे आल्या. ४-५ माणसे त्या पेटया उघडून त्यातील सामान काढू लागली. त्या पेटयात दिल्लीच्या दक्षता समितीने तयार केलेल्या हुंडाविरोधी प्रदर्शनाचे स्टँडस् होते. प्रमिलाताईच्या मार्गदर्शनाखाली तासाभरात हॉलच्या मधोमध ते स्टँडस् उभे केले गेले पोस्टर्स लावली गेली, बॅनर्स झळकू लागले.

हॉलच्या एका बाजूला धुळयातील कलाकार पुंडलिक वसईकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर काढलेली चित्रे लावली होती. हॉलच्या प्रवेशदाराशी धुळे येथील स्त्रियांनी बनविलेले तयार कपडे विक्रीसाठी टेबलावर मांडले होते. कुणा संस्थेचे पापड, कुडया वगैरे घरगुती पदार्थही विक्रीसाठी होते. उद्घाटनाच्या समया आम्ही ४-५ जणींनी फुलांनी सजविल्या. त्यातील एक हॉलच्या प्रवेशदाराशी ठेवली व एक अधिवेशनाच्या मांडवात नेऊन ठेवली. एवढयात झाडांच्या कुंडया आल्या. त्या प्रदर्शनाच्या मध्ये मध्ये मांडल्या गेल्या रंगीत कागदांनी कुंडया मढवायचे ठरले. कातरकाम सुबक करणाऱ्या मीराताई भागवत मग पुढे सरसावल्या व बघता बघता रंगीबेरंगी कागदांनी कुंडया सजवल्या गेल्या.

जनता पक्षाच्या अखिल भारतीय चिटणीस सरोजिनी महिषी यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन करून अधिवेशनाला सुरवात केली. समाजवादी महिला सभेच्या धुळे येथील स्त्रियांनी स्वागतगीत म्हटले. नंतर महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्यावर रचलेले 'नमन झाले.

धुळयाच्या अधिवेशनाची प्रमुख जबाबदारी अंगावर घेतलेल्या विजयाताई चौक यांनी आपल्या स्वागताच्या भाषणास सुरवात केली. खुल्या अधिवेशनाला परगावाहून ५००-६०० बायकांसह २-३ हजार महिला उपस्थित होत्या. धुळे जिल्ह्यातून ३०-३५ आदिवासी महिलाही आल्या होत्या व मासवणला काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबर तिथल्याही १०-१२ आदिवासी स्त्रिया आल्या होत्या. धुळयासारख्या महाराष्ट्राच्या उत्तरेच्या

...ला असलेल्या ठिकाणी अधिवेशन भरवले याबद्दल ...द व्यक्त करून विजयाताईंनी आपल्या स्वागताच्या ...णात धुळे परिसराची ओळख करून दिली. स्वातंत्र्य ...दोलनापासून धुळ्याला झालेल्या घटनांचा आढावा ...ला. स्वातंत्र्याच्या आंदोलनात शिरीषकुमारसारख्या ...वळ्या बालकाची आहुती पडल्याचा आवर्जून उल्लेख ...ला.

धुळ्याच्या तुरुंगात कै. माने गुरुजी जमनालाल ...ज, शंकरराव देव व विनोबा भावे होते. विनोबांच्या ...ताई 'चा जन्म धुळे तुरुंगातलाच. स्वातंत्र्य आंदो-...तील धुळ्याच्या कमलाबाई अष्टपुत्रे, रमाबाई ...ने, शारदाबाई पुंडलिक पाटील व सरस्वतीबाई ...ने या स्त्रियांचा गौरवपूर्ण उल्लेख करून स्वातंत्र्य ...दोलनातील वयोवृद्ध ज्येष्ठ नेते फकिरा आप्पा देवरे ...च्या कार्याचाही उल्लेख केला.

सरोजिनी महिषी ह्या अधिवेशनाच्या प्रमुख पाहुण्या ...ईच्या ज्योती पेटवून त्यांनी अधिवेशनाचे उद्घाटन ...ले. आपल्या खणखणीत मराठी भाषणात त्यांनी ...राणकालापासून चालत आलेल्या रुढीने स्त्रीला कसे ...म ठेवले यांचे सुंदर विवेचन केले. ज्या संसाराचा ...टाचा जास्त भार स्त्री उचलते, त्या संसारातील ...वर मात्र तिचा अधिकार नसतो. स्त्रीने कष्ट ...रायचे व पुरुषाने अधिकार गाजवायचा ही विषमता ...ता नष्ट झाली पाहिजे. कायद्याने स्वातंत्र्यानंतर ...त्रयांना समान अधिकार मिळाले आहेत पण अज्ञानाने ... रुढीच्या बंधनाने तिला अजून त्याचा लाभ मात्र ...ळत नाही, हे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

अधिवेशनाच्या निमित्ताने स्मरणिका छापली होती, ...चे उद्घाटन प्रमिलाताईंनी केले. राज्य करणारी ...क स्त्री असली म्हणजे स्त्रियांचे प्रश्न सुटले असे होत ...ही असे सांगून, ठिकठिकाणी स्त्रियांवर एक स्त्री ...प्रधान असतानाही कसे अत्याचार होतात हे ...पद केले.

हुंडाविरोधी कायदा होऊन नुसता उपयोग नाही. ...साठी स्त्रीशिक्षणाची आवश्यकता आहे. हुंड्यामुळे ...तिदिनी स्त्रियांचे बळी जात आहेत. आजही विसाव्या शतकात. तेव्हा या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारकडे मागणी करायची आहे.

समाजवादी महिला सभेच्या अध्यक्षा माई केदारी यांनी अध्यक्षीय भाषण केले. २ वर्षाच्या स.म. सभेच्या कार्याची माहिती दिली. शासनावर व कायदेकानूंवर अवलंबून न रहाताना स्त्रियांना सुसंस्कृत करून समाजवादाची शिकवण देणे व तिचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न संस्था करते हे सांगितले. स. म. सभेच्या चिटणीस कमल पाध्ये यांनी २ वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. स. म. सभेच्या महाराष्ट्रात एकूण ३९ शाखा आहेत. त्या शाखांच्या कामाचा अहवाल, तसेच बालवाड्या पाळणाघरे, प्रौढ शिक्षणवर्ग, सहकारी संस्था, स्त्रियांचे मेळावे, शिबिरे, अभ्यासवर्ग यांच्या कामाची माहिती दिली.

या अधिवेशनात स्वातंत्र्यसैनिक स्त्रियांचा सत्कार करण्यात आला. तसेच स. म. सभेने प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकांच्या लेखिकांचाही गौरव केला गेला.

स. म. सभेच्या अधिवेशनाला धुळ्याचे नेते पी. के. पाटलांनी सर्वांचे स्वागत केले व स्त्री मोठी की पुरुष मोठा असा वाद न घालता एकमेकांच्या सहकार्याने काम करावे असे सांगितले.

विजयाताई चौक यांना अधिवेशनासाठी वेगवेगळ्या संस्थाकडून मदत मिळविली होती. कुणी दूध, कुणी धान्य, अशा स्वरुपात मदत दिली. तिथल्या विडी कामगार बायकांनी पण एकएक रुपया देऊन आपला वाटा उचलला होता. खुले अधिवेशन संपल्यानंतर २-४ तास मध्ये होते. त्यावेळी तिथे आलेल्या आदिवासी स्त्रियांनी काही पारंपारिक नृत्यप्रकार केले. झिम्मा, आगोटा पागोटा, कोंबडा वगैरे.

रात्री ९॥ वाजता अधिवेशनाच्या ठरावांना सुरुवात झाली. प्रथम शिक्षणतज्ञ जे. पी. नाईक, महाराष्ट्राचे विचारवंत प्रा. अ. भि. शहा व नागपूरच्या समाजसेविका कमलाबाई होस्पेट यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नुकतीच मुंबईची बातमी होती; भेसळीच्या तेलामुळे माणसे अपंग झाली. त्यामुळे भेसळप्रतिबंधक काय-

द्याची कडक अंमलबजावणी करावी. मुलांना सकस आहार दिला जातो तो अत्यंत निकृष्ट असतो. समाजकल्याण खाते त्याबद्दल असावे तेवढे जागरूक नसते. म्हणून ठरावात अशी मागणी करण्यात आली की भेसळ प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी करावी व स्वस्त धान्य दुकानातून दिल्या जाणाऱ्या अन्नपदार्थात जीवनसत्वे भिसळून द्यावीत.

अहमदाबाद येथील 'सेवा' या संस्थेतील श्रीमती इला भट यांच्यावर झालेल्या अन्यायाचा निषेध करण्यात आला. श्रमजीवी स्त्रियांच्यात उत्तम काम केल्याबद्दल त्यांना २ वर्षापूर्वी मॅग्सेसचे पारितोषिक मिळाले होते. परंतु त्यांचे अहमदाबादच्या मजदूर महाजनचा संस्थेचे घटक सभासदत्व रद्द करण्यात आले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री–संस्थेची भरभराट झालेली सहन होत नाही असेच म्हणावे काय? असे अतिशय तळमळीने अनुताई लिमये यांनी विचारले.

या पुढचा ठराव महिला सहकारी संस्थांच्या मागण्यांचा होता. गेल्या २५–३० वर्षात महाराष्ट्रात अनेक महिला सहकारी संस्था निघाल्यात. मोठे सहकारी साखर कारखाने सोडले तर या सर्व संस्थांची गुंतवणूक अतिशय अल्प असते. गरीब स्त्रियांना काम मिळावे म्हणून सामाजिक जाणिव असलेल्या कार्यकर्त्या अशा संस्था चालवितात. पण काम करताना त्यांना सहकारी खाते, बॅंकिंग, अर्थ व्यवहार, कामगार–विषयक कागदे या तांत्रिक बाबीचा अतिशय त्रास होतो. यासाठी सहकारी संस्थांचे फेडरेशन असावे व त्यावर असणाऱ्या सेक्रेटरीचा निम्मा पगार शासनाने द्यावा व या संस्थांकडे सहानुभूतीने पाहून मदत करावी अशी ठरावाने मागणी करण्यात आली.

असे ४–५ ठराव पास झाले. तोपर्यंत रात्रीने ११॥ वाजले होते.

दुसऱ्या दिवशी ९॥ वाजता पुन्हा कार्यकर्ती मंडळी पुढील ठरावाना बसली.

प्रमिला ताईनी भाषणात सांगितलेल्या महिला आयोगाची नियुक्ती करण्याची मागणी केली गेली. मुस्लिम स्त्रियांना सिनेमा पाहण्यात बंदी करण्यात आली या कृतीचा निषेध एका ठरावाने करण्यात आला. तो ठराव रशिदा मुलवल्ली या मुस्लिम स्त्रीनेच मांडला. सिनेमा पाहून स्त्रिया बिघडत असतील तर पुरुष का बिघडणार? असा सवाल करून हा स्त्रियांवरील अन्यायाचा, त्यांना दडपण्याचा मुस्लिम समाजाचा प्रयत्न आहे म्हणून त्यांचा निषेध केला पाहिजे.

पालघर तालुक्यातील आदिवासी स्त्रिया लाकूडफाटा गोळा करायला जंगलात जातात. तेव्हा त्यांना सरकारचे संरक्षण द्यावे असा ठराव कमल घोडके या आदिवासी महिलेनेच मांडला. जंगलचे संरक्षण व संवर्धनाचे काम आदिवासींच्या हातात द्यावे. त्यांना रोजगार पण मिळेल व फॉरेस्ट गार्डपेक्षा ते लोक जास्ती आपलेपणाने वनसंवर्धन करतील अशी त्या ठरावाला यमुताई सानें यांनी सूचना केली.

शेतमजूर स्त्रियांना ७ रु. मजुरी मिळावी तसेच जीवनावश्यक वस्तू योग्य दराने भरपूर प्रमाणात मिळाव्यात अशी ठरावाद्वारे मागणी करण्यात आली.

सामाजिक परिवर्तनासाठी सर्व स. म. सभेच्या शाखांनी काम करावे असा ठराव कमल पाध्ये यांनी मांडला. कारण वाढता भ्रष्टाचार, महागाई, दलित स्त्रियांवर अत्याचार प्रतिदिनी चालू आहे. त्याला तोंड देण्यासाठी स्त्रियांनीच जागृत झाले पाहिजे असे विचार त्यांनी आपल्या विस्तृत ४ कलमी ठरावाद्वारे मांडले.

सावित्रीबाई फुल्यांच्या प्रतिमेचे सील तयार करून ते विक्रीसाठी ठेवले होते. त्यातून येणाऱ्या पैशातून ना. दा. ठाकरसी विद्यापीठात मागासवर्गीय विद्यार्थिनींसाठी एक कायमची शिष्यवृत्ती देण्याची योजना करण्यात आली आहे. त्याला पाठिंबा देणारा ठराव पास झाला.

मुंबई, पुणे, ठाणे, सांगली, वाई, कोपरगाव, पालघर व धुळे अशा वेगवेगळ्या ठिकाणाहून स्त्रिया एकत्र आल्या होत्या. खासदार, आमदार स्त्रियांपासून अशिक्षित स्त्रिया, तसेच आर्थिक सुस्थितीतील स्त्रियांपासून मासवण व धुळ्यातील काही आदिवासी स्त्रिया, अशा सगळ्या दोन दिवस एकत्र होत्या. एकमेकींना समजावून घेणे, मदत करणे, अशी वृत्ती बहुतेक स्त्रियांमध्ये होती